INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2019 Special Issue –90 (B)

## महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi),
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)


For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**COSMOS IMPACT FACTOR**

Search Journal | Search

HOME | INDEXED JOURNAL | SUGGEST JOURNAL | REQUEST IF | DOWNLOAD LOGO | REVIEWER PANEL



Category

- INDEXED JOURNAL
- SUGGEST JOURNAL
- JOURNAL IF
- REQUEST FOR IF
- DOWNLOAD LOGO
- CONTACT US
- SAMPLE CERTIFICATE
- SAMPLE EVALUATION SHEET

## Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2348-7143 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dhanraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@gmail.com |
| Phone No. | +91 7709752380 |
| Cosmos Impact Factor | 2015 : 3.452 |

**GIF**
GLOBAL IMPACT

News Updates Due to large number of application please allow us time to update your journal



**Get Involved**

- Home
- Evaluation Method
- Journal List
- Apply for Evaluation/Free Service
- Journal Search

**Recently Added Journals**

| Research Journ | |
|---|---|
| ISSN | 2348-7143 |
| Country | India |
| Frequency | Quarterly |
| Year publication | 2014-2015 |
| Website | researchjourney.net |
| Global Impact and Quality Factor | |
| 2014 | 0.565 |
| 2015 | 0.676 |

## Research Journey

**SJIF 2018:**

Under evaluation

Area: Multidisciplinary

Evaluated version: online

**Previous evaluation SJIF**

2017: 6.261
2016: 6.087
2015: 3.986
2014: 3.009

**The journal is indexed in:**

SJIFactor.com

**Basic information**

| | |
|---|---|
| Main title | **Research Journey** |
| Other title [English] | Research Journey |
| Abbreviated title | |
| ISSN | 2348-7143 (E) |
| URL | http://WWW.RESEARCHJOURNEY.NET/ |
| Country | India |
| Journal's character | Scientific |
| Frequency | Quarterly |
| License | Free for educational use |
| Texts availability | Free |

**SWATIDHAN PUBLICATIONS** **Price : Rs. 700/-**

**For Details Visit To : www.researchjourney.net**

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) | January-2019
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता
UGC Approved Journal

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक /लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | विद्यार्थ्यांना परीक्षेमुळे येणाऱ्या ताण – तणावांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी योगा एक प्रभावी उपाय | प्रा.जय सोने | 06 |
| 2 | महाराष्ट्रातील विभागनिहाय सिंचन निर्मिती व अनुशेष | प्रा.प्रविण कुलकर्णी | 08 |
| 3 | महाराष्ट्रातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचे बदलते स्वरूप – एक अभ्यास | प्रा.मेघा पाटोळे | 11 |
| 4 | महाराष्ट्राची अर्थव्यवस्था – एक मंथन | प्रा. हरिहर मोहोकार | 15 |
| 5 | महाराष्ट्रातील दुग्ध सहकारी चळवळ – एक आर्थिक दृष्टीकोन | ज्योती महाजन | 19 |
| 6 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल आणि सामाजिक – आर्थिक विकास | डॉ.क्रांती बोरावके | 23 |
| 7 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ | प्रा.विजय तोंडारे | 29 |
| 8 | महाराष्ट्रातील सिंचन योजनांवरील खर्च प्रवृत्तीचे विश्लेषण | डॉ.प्रशांत देशमुख | 32 |
| 9 | महाराष्ट्राच्या सामाजिक विकासात फुले दाम्पत्याचे योगदान | डॉ.उद्धव कांबळे | 37 |
| 10 | महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातील जलसिंचनाचा अनुशेष | डॉ.विजय नागरे | 41 |
| 11 | महाराष्ट्राच्या विकासात लोकनेते शरद पवारांचे योगदान : एक दृष्टीक्षेप | डॉ.प्रभाकर जगताप | 49 |
| 12 | महाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोल कारणे आणि परिणाम | प्रा.प्रदीप केंद्रे | 53 |
| 13 | महाराष्ट्रातील कामगार चळवळ : ऐतिहासिक, सामाजिक ,राजकीय एक मागोवा | डॉ.रामदास निहाळ | 58 |
| 14 | मराठवाड्याचे मागासलेपण आणि धोरणांचा दुष्काळ | डॉ.श्रीकांत देशमुख | 61 |
| 15 | महाराष्ट्रातील राजकीय संस्कृती | प्रा.विशाल कुंभार | 64 |
| 16 | महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्थेतील महिला नेतृत्व : वास्तव आणि उपाय | डॉ.नंदकिशोर उगले व डॉ.क्रांती बोरावके व सहदेव रोडे | 67 |
| 17 | भारतीय लोकशाही : तत्त्व आणि व्यवहार | डॉ.पंडित नलावडे व डॉ.नंदकिशोर उगले | 72 |
| 18 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ : सहकारी साखर कारखाने -एक अवलोकन | डॉ.बाबासाहेब देशमुख | 76 |
| 19 | महाराष्ट्रातील झोपडपट्टीवासीयांचे समाजजीवन आणि राजकारण | डॉ.बेग रेहानाआरा ईस्माइल | 79 |
| 20 | महाराष्ट्रातील सहकारी चळवळ – आव्हाने व उपाय | डॉ.श्रीमती मीना पाटील | 84 |
| 21 | महाराष्ट्रातील आर्थिक विषमता आणि उपायांबाबत संक्षिप्त आढावा (२०१६ -१७) | डॉ.एम. जी. थोपटे | 88 |
| 22 | मराठवाड्यांचे आर्थिक मागासलेपण – एक आढावा | डॉ.बी.पी.गाडेकर | 93 |
| 23 | महाराष्ट्रातील प्रादेशिक भागातील ग्रामीण दारिद्र्याच्या विषमतेचा अभ्यास | प्रा.भगवान देशमुख | 100 |
| 24 | महाराष्ट्रातील कृषी भूमीउपयोजन : एक चिकित्सक अभ्यास | डॉ.सदाशिव मेंगाळ | 104 |
| 25 | महाराष्ट्रातील ग्रामीण विकासात स्थानिक नेतृत्वाची भूमिका | डॉ.नंदकिशोर उगले, डॉ.कुमुदिनी जोगी | 109 |


SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) January-2019
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता
UGC Approved Journal

# महाराष्ट्रातील झोपडपट्टीवासीयांचे समाजजीवन आणि राजकारण

डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
श्री पद्ममणि जैन महाविद्यालय पाबळ

महाराष्ट्रात वाढत्या औद्योगीकरणातून मोठया प्रमाणात नागरीकरण झालेले आहे. शहरीकरणाच्या दृश्यस्वरूपातील परिणाम म्हणजे झोपडपट्टीवासीयांचा अभ्यास एक सामाजिक समूह म्हणून करणे आवश्यक वाटते. सर्व विकसीत आणि विकसनशील देशांना वाढत्या झोपडपट्टयांची समस्या आणि पर्यायाने झोपडपट्टीवासीयांच्या समस्या भेडसावतात. अगदी लहान शहरांमध्ये देखील १० ते २० टक्के लोक अशा गलिच्छवस्त्यांमधून राहत आहेत. झोपडपट्टयांचा विविधप्रकारे अभ्यास केला गेला परंतु तरीही झोपडपट्टीवासीयांच्या जीवनमानात सुधारणा झालेली दिसत नाही. झोपडपट्टया वाढण्यास औद्योगीकरण,शहरीकरण,नागरीकरण आणि स्थलंतरीतांची प्रक्रिया कारणीभूत ठरते तेवढयाच प्रमाणात शहरी राजकारणदेखील झोपडपट्टया वाढू देण्यास कारण ठरत आहे. थोडक्यात काय तर राजकीय,सामाजिक आणि शासकीय,आर्थिक कारणे गलिच्छवस्त्या वाढण्यास कारणीभूत असतात. सर्वात महत्वाचे आर्थिक कारण आहे. शहरात घरांची कमतरता आणि ग्रामीण ते शहरी स्थलंतरातून झोपडपट्टयांची वाढ होत असते. राजकीय पुढाऱ्यांच्या झोपडीवासीयांकडे वोट बॅंक म्हणून पाहाण्याचा दृष्टीकोनही झोपडपट्टयाना महत्व प्राप्त होत आहे. वाढती लोकसंख्या आणि शहरी नियोजनाची अयशस्वीता वाढत्या गलिच्छवस्त्या निर्माण करण्यास मदत करत असतात.

झोपडीववावसीयांच्या सामाजिक आर्थिक पाहणीतून त्यांचे समाजजीवन कशा पध्दतीचे आहे हे लक्षात येते. झोपडपट्टीत राहणारे काय काम करतात? कोणत्या धर्म,जात प्रवर्गातील आहेत? यावरून त्यांचे झोपडपट्टीत येण्यामागची त्यांची कारणे लक्षात येतात. ग्रामीण ते शहरी होणारे स्थलंतर पाहाता डबघाईस आलेली ग्रामीण शेती अर्थव्यवस्था एक कारण महत्वाचे आहे परंतु त्याचबरोबर स्थलंतरीतांमध्ये मोठयाप्रमाणात अनुसुचित जाती,जमातीचे लोक देखील आहेत शहरात उच्च जीवनमान जगण्यासाठी आणि ग्रामीण भागातील जातीव्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी मोठया प्रमाणात हे लोक शहराकडे येतात.त्याचप्रमाणे शहरात कारखाने, व्यवसाय, औद्योगीकरणातून वेगवेगळे उदयोगधंदे चालू असतात रोजगाराच्या अपेक्षेने अनेकांचे स्थलांतर होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत मजुरी करणारा वर्ग शहरात येवून अकुशल कामगार म्हणून काम करतो. अपुऱ्या वेतनामुळे शहरात त्यांना झोपडपट्टयांचा आसरा घ्यावा लागतो. आर्थिकदृष्टया हे झोपडीवासीय दुर्बल असतात. झोपडीवासीय असंघटीत क्षेत्रात, अनियीमत स्वरूपाचे काम करत असल्याने त्यांना मिळणारे उत्पन्न हे तुटपुंजे असते अशा परिस्थितीत आपल्या दैनंदिन जीवनाच्या विवंचनेत हा वर्ग राजकीय व्यवस्थेंपासून दूर जातो. त्यांचा राजकीय सहभाग नगण्य असतो त्यांचा वापर फक्त एक गठ्ठा मतांकरीता करून घेतला जातो. झोपडीवासीय समूह हा राजकीय प्रक्रियेपासून दूर गेलेला असतो. आर्थिक विवंचनेतून सुटका मिळत नाही त्यामुळे राजकीय जागृकता असूनही हा वर्ग राजकीय व्यवस्थेपासून दूर असलेला दिसतो.

झोपडीवासीयांमध्ये दलित, ओबीसी जाती मोठया प्रमाणात आढळतात विशेषत: दलितांचे प्रमाण अधिक आहे. भांडवली विकासाच्या परिणामी शहरीकरणाचा प्रसार मोठया प्रमाणात होत आहे. मोठया शहरांच्याभोवती साचलेले औद्योगीकरण आणि शेती क्षेत्रात संपुष्टात आलेल्या रोजगारामुळे शहरांमध्ये लोकांचे स्थलंतर वाढत

आहे. शहरांच्या अनियोजीत वाढीमुळे झोपडपट्टयांची संख्या वाढत आहे. शासनाकडून शहरा शेजारील खेडयांचा समावेश शहरात केला जात आहे परंतु या पर्यायाने मात्र शहर विकासात खिळ बसत आहे. अर्थव्यवस्थेचे नियोजन खेडे हे केंद्र धरून केले गेले तरच शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतर थांबू शकेल व परिणामी शहरात झोपडयांचे प्रमाण कमी होवू शकते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताची कृषीप्रधान अवस्थेपासून उदयोगप्रधानतेकडे वाटचाल सुरू झाली. नव्या नव्या योजनान्वये लघुउदयोगापासून ते मोठमोठया कारखान्यापर्यंत नव नवीन उदयोग निघू लागले, देशाचे औद्योगीकरण होवू लागले,जुन्या रूढी ,परंपरांचा लोप होवू लागला नवे आचार विचार रूढ होवू लागले. अशा प्रकारे सामाजिक परिवर्तनाला चालना मिळाली. शहरीकरण वाढू लागले परवा परवा पर्यंत मोकळी पडलेली माळराने झोपडयांनी भरू लागली मोकळया जागांवर जुन्या पत्र्यांच्या, लाकडी फळयांच्या, कुडाच्या झोपडया उभारल्या जावू लागल्या. झोपडपट्टयांचे निर्मुलन करून मनुष्य वस्तीला योग्य अशी निवासस्थाने कशी प्राप्त करून दयावी हा देशातल्या औद्योगीक शहरांपुढे मोठा प्रश्न आहे. डॉ. व्यंकट रायप्पा यांनी म्हैसूरमधील दोन वस्त्यांवर प्रबंध लिहिला त्यात ते म्हणतात भारतातील बहुतेक सर्व शहरांची वाढ योजनाबध्दरित्या झालेली नाही. त्यामुळे नागरी जीवनाच्या सुरक्षिततेला धोका पोहोचविणाऱ्या असंख्य वस्तु दिसून येतात तर नर्क्स या विचारवंताच्या मते अविकीत राष्ट्रात दारिद्रयामुळे दारिद्रय निर्माण होते. नागरिकरणाचा विचार केल्यास महाराष्ट्रात १९७१ मध्ये ३१टक्के, १९८१ मध्ये ३५ आणि १९९१ मध्ये ३८ टक्के नागरीकरणाचा वेग होता. हा वेग वाढत असलेला दिसतो भारताच्या नागरीकरणाच्या वाढीत माहराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. ग्रामीण दुर्गम भागात दळणवळणाच्या सोई सुविधा वाढविल्यास शहराकडे होणारे स्थलांतर थांबू शकेल. कोकण रत्नागिरीचा विकास करून मुंबईत होणारे स्थलांतर थांबवता येवू शकते. अशाच पध्दतीने नाशिक, धुळे, पुणे,सोलापूर,अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड,बीड, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा या पट्टयांचा विकास होवू शकतो. आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी ही मुंबईत तयार झाली आहे. महाराष्ट्रात १९९१ च्या जनगणनेनुसार ३८.७ टक्के जनता मुंबईत राहते. मुंबईच्या एकूण लोकसंख्येपैकी ५५ टक्के लोक झोपडपट्टीत राहातात तर १८ टक्के लोक एका खोलीच्या घरात राहतात. औद्योगीकरणामुळे झालेल्या शहरीकरणाचे हे फळ आहे. मुंबईप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रात शहरीकरणाचा वेग वाढत आहे मुंबई शेजारील ठाणे, कल्याण उल्हासनगर,पुणे,औरंगाबाद,नागपूर,नगर,नाशिक ही महाराष्ट्रातील काही प्रमुख शहरे आहेत जेथे मोठया प्रमाणत नागरीकरणातून झोपडपट्टया वाढल्या आहेत.

झोपडीवासीयांचे समाजजीवन – औद्योगीकरण, नागरीकरण आणि स्थलांतराच्या प्रक्रियेतून झोपडपट्टयांची निर्मिती होत आहे. नागरीकरण आणि औद्योगीकरण यांचा जवळचा संबंध आहे. आर्थिक विकासाकडे वाटचाल करणाऱ्या राष्ट्रात औद्योगीकरणावर भर दिला जातो. समतोल आर्थिक विकासासाठी हे आवश्यक असते नागरी सुविधायुक्त औद्योगीक शहरांकडे लोक आकर्षीत होतात त्यातून नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होते. अशा प्रकारच्या नागरीकरणामुळे आर्थिक, सामाजिक, भौतिक समस्या शहरात निर्माण होतात. सर्वांनाच शहरात काम दिले जावू शकत नाही. वाढत्या गर्दीमुळे वाहतूक व्यवस्था कोलमडते, राहण्याचा प्रश्न उद्भवतो, शहरात भीकवृत्ती, दारिद्रय, बेकारी,अनारोग्य,वेश्यावृत्ती,झोपडपट्टया,गृहटंचाई, गुन्हेगारी या सारख्या समस्यांचे पेव फुटते. भ्रष्टाचार, गुन्हेगारी, गलिच्छवस्त्या, भग्न कुटुंबे,बालगुन्हेगारी सारख्या भौतिक समस्या निर्माण होतात. बेकार तरूण एकत्र येवून टोळया तयार होतात. परिणामी गुन्हेगारीकरण वाढते. ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर केल्याने अनेक गावे ओस पडली आहेत. ग्रामीण भागात पाण्याचा अभाव,सतत पडणारा



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal.Shirur Dist.Pune

दुष्काळ यामुळे लोकांना बाराही महिने काम नसते त्यामूळे ग्रामीण भागात मोठया प्रमाणात बेकारी वाढते. वाढत्या झोपडपट्टया विकास मार्गाला अपायकारक ठरतात. शहरीकरण हे औद्योगीकरणाचे कुरूप अपत्य आहे आणि गलिच्छवस्त्या विसंवादी नागरी नियोजनाचे फलित आहे. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांचा मुख्य प्रश्न अन्न, वस्त्र, निवारा आहे. देसाई आणि पल्लई या अभ्यासकांच्या मते सामाजिक, आर्थिक दृष्टीकोनातून पाहिल्यास पिरॅमिड सारख्या प्रतिकृतीमध्ये खालच्या पायथ्याचा भाग हा झोपडीवासीयांच्या जीवनाचा दिसतो. त्यांना उच्च जीवन जगण्याचा अधिकार मिळत नाही. ग्रामीण भागातून स्थलांतरीत झालेले हे खालच्या जातीतील लोक मुख्यत: असतात. त्यांना ग्रामीण किंवा शहरी जीवनात देखील सामाजिकदृष्टया कनिष्ठ मानले जाते ते आर्थिकदृष्टया देखील कमकुवत असतात. शहरात आल्यानंतर या लोकांना ग्रामीण आणि शहरी संस्कृतीत मेळ घालावा लागतो. ते पूर्णत्वाने शहरी किंवा ग्रामीण भागाशी आपली अस्मीता टिकवू शकत नाहीत. असंघटीत क्षेत्रात काम करणारे हे लोक दारिद्रय रेषेखालचे जीवन जगत असतात. अनियमित रोजगार, कमी वेतन, शिक्षणाचे प्रमाण यांच्यात नगण्य असते. झोपडपट्टीतील स्त्रिया देखील निकृष्ठ प्रतिचे आणि कमी रोजगार मिळणारे काम करतांना दिसतात. ग्रामीण भागातून स्थलांतरीत झालेल्या झोपडीवासीयांकडे आधुनिक तंत्रज्ञान नसल्याने ते शहरीव्यवस्थेत अकुशल ठरतात. त्यामुळे त्यांना स्थायी स्वरूपाचा, अधिक वेतनाचा रोजगार मिळत नाही. झोपडीवासीय मुख्यत: हमाल,बिगारीकाम, घरगडी, नोकर, बांधकाम मजूर अशा स्वरूपाचे काम करतात. कमी वेतनामुळे हे लोक झोपडपट्टयांत राहातात. इ.इ. बर्गेल म्हणतात गरीबी, दारिद्रय हे सर्वात मोठे कारण आहे झोपडपट्टया निर्माण होण्याचे. झोपडीवासीयांचा आर्थिकस्तर निकृष्ठ असल्याने त्यांचे आरोग्य ही निकृष्ठ असते. स्वच्छतेचा अभाव असतो. त्यांची जीवन जगण्याची रीत, समाजापासून अलग राहण्याची सवय, स्थलांतरीतांच्या भावना, झोपडपट्टीत राहण्याची मानसिकता हे झोपडीवासीयांचे प्रमुख गुणविशेष दिसतात. इ.इ. बर्गेल म्हणतात झोपडपट्टया सुरवाती पासूनच खराब असतात त्या सुधारण्यास कोणताच वाव नसतो. जिथे मोठ मोठे कारखाने आहेत त्याच्या आसपास झोपडपट्टया तयार होत असतात. लोकांना कामावर जाण्यासाठी कमी खर्चात जाता यावे यासाठी ते जवळच वस्ती करून राहातात. एक कुटुंब राहू शकेल एवढया जागेत दोन तीन कुटुंबे राहातात. शहरांमध्ये घरांची कमतरता, जागेच्या वाढणाऱ्या किंमती, ग्रामीण ते शहरी स्थलांतर यामुळे झोपडपट्टया उदयास येतात. त्याचप्रमाणे ए.सी. अगरवाल म्हणतात निरक्षरता, वाढती लोकसंख्या आणि शहर नियोजनातील अयशस्वीता हे झोपडपट्टया निर्मितीस कारण ठरतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या नागरी जमीन धोरणाच्या अहवालात आधुनिक गलिच्छवस्त्यांची लक्षणे सांगितली आहेत. यावरून देखील झोपडीवासीयांचे समाजजीवन लक्षात येते युनोच्या मते अपुऱ्या राहत्या जागेत झालेली माणसांची गर्दी दाटी, जागेचा खालावलेला दर्जा, अनारोग्यकारक परिसर किंवा स्वच्छतेच्या सोयी सवलतींचा अभाव आणि तेथील रहिवाश्यांच्या किंवा एकंदर समाजाच्या आरोग्याला, सुरक्षितेला किंवा नितिमत्तेला पोहोचणारा धोका इ. लक्षणांनीयुक्त असलेली एखादी इमारत, इमारतींचा समूह अगर प्रदेश यांना गलिच्छवस्ती म्हणता येईल. गलिच्छवस्त्यांमध्ये घरे, घरांभोवती मोकळया जागेचा अभाव, घरात हवा, उजेडाचा अभाव, सांडपाणी वाहून नेणारी गटारे नसणे, रस्त्यांचा अभाव, भोवतालचा परिसर दुर्गंधीयुक्त कचऱ्यांने व पाण्याने भरलेला असतो. समाजातील प्रचलीत अर्थव्यवस्थेत, सांस्कृतीकदृष्टया अगदी हीन पातळीवर असलेले लरेक या गलिच्छवस्तीत राहातात. त्यांना या वस्त्यांमध्ये राहणे क्रमप्राप्त ठरते गलिच्छवस्त्यांमुळे शहरांचे आरोग्यही बिघाछत आहे. रोगराई, साथीचा प्रादुर्भाव अशा वस्त्यातून मोठया प्रमाणात आढळतो. सर्व प्रकारची व्यसने, गुन्हेगारी यास हवे असणारे पर्यावरण झोपडपट्टीत आढळते. महाराष्ट्रात झोपडपट्टयांमध्ये सामाजिक, आरोग्य विषयक जागृती करण्याचा प्रयत्न अनेक अराजकीय संघटना



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE, Pabal, Tal.Shirur, Dist.Pune

करतांना दिसतात याबरोबरच शहर व उदयोग विकास महामंडळ, मोठया शहरांमधून झोपडपट्टी सुधारसमित्याही काम करत आहेत. महाराष्ट्राप्रमाणेच तामिळनाडू, गुजरा पं.बंगाल, पंजाब, हरियाणा या राज्यांमधून नगरनियोजन विषयक कायदे करण्यात आले आहेत. झोपडपट्टी निर्मूलन आणि सुधारणा साठी केंद्रशासन राज्यांना आणि केंद्रशासीत प्रदेशांना आर्थिक मदतही करते.

झोपडपट्टीवासीयांची उपेक्षा आणि राजकीय सहभाग – झोपडीववासीयांचे जीवनमान हे आर्थिक राजकीय, सामाजिक पातळीवर विस्कळीत स्वरूपात आढळते. ग्रामीण व्यवस्थेतून बाहेर आलेले झोपडीवासीय शहरी अर्थव्यवस्थेत, राजकीय व्यवस्थेत उपरेच असतात. झोपडीवासीय दुय्यम नागरीकांचे जीवन जगत असतात. भांडवली अर्थव्यवस्थेचे कुरूप स्वरूप म्हणजे झोपडपट्टया आहेत. डी वीट यांनी मद्रासच्या झोपडपट्टयांचा अभ्यास केला आहे ते म्हणतात झोपडीवासीय आपली जात आणि आपल्या ग्रामीण अस्मितेशी सांस्कृतीकदृष्टया समरस झालेले दिसतात परंतु या लोकांची राजकीय एकजूट होत नाही. अशा वेळेस या झोपडीवीयांचे संघटन हे आर्थिक पायावर, असंघटी, अंगमेहनती कामगार या संकल्पनेच्या आधारे करता येवू शकते तसेच व्यवसायानुरूप ही संघटन करता येवू शकते ग्रामीण भागातून येणारे शहरी अर्थव्यवस्थेत सामावले जात नाहीत तसेच ते ग्रामीण अर्थव्यवस्थेतही उपरेच राहतात. फरक एवढाच होतो की जातीव्यवस्थेचे रूपांतर वर्गव्यवस्थेत होते. पारंपारीक धर्म संकल्पना बदलतात जातीव्यवस्थेची धार शहरात थोडी बोथट होते ती पूर्ण कमी होत नाही ग्रामीण भागात जाती संघर्ष जितका गंभीर आहे तेवढा शहरात प्रखरता जाणवत नाही. जसे गावात महारवाडा, मांगवाडा,, ढोरवाडा, होता तसाच शहरात आंबेडकरनगर, सिध्दार्थनगर, इंदिरानगर, चांभारगल्ली, ढोरगल्ली अशा वस्त्या आढळतात ग्रामीण भागातून शहरी भागात ढकलले गेलेले हे समूह निवारा,व्यवसायाच्या शोधार्थ फिरत असतात. जे उपेक्षेचे जीवन आधी जगत आले आहेत तसेच काही प्रमाणात हा समाज शहरातही जीवन जगत असतात. भटक्या विमुक्तांचे प्रमाण झोपडट्टयांत कमी आढळते तर हिंदुमधील महार, मांग,चांभारत, मुस्लिमांमधील ओबीसींचे प्रमाण सर्वाधीक आहे. लहान शेतकरी, शेतीहीन मजूर यांचे प्रमाण झोपडपट्टीत काहीसे दिसते. झोपडट्टीत जात आणि व्यवसाय यांचा संबंध पाहाता जात हा घटक मागे पडून सर्वच जाती जमातींच्या लोकांना आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही प्रकारचे काम करावे लागते सर्व जाती जमातीचे लोक कनिष्ठ प्रतीचे व्यवसाय,काम करतांना दिसतात. झोपडीवासीयांचे सामाजिक विश्व पाहाता हे लोक आपल्या कनिष्ठ प्रतीव्या कामामुळे, निकृष्ठ राहणीमानामुळे, गलिच्छ वस्तीस्थनामुळे समाजपासून, मुख्यप्रवाहापासून दूर गेलेली असतात. त्यांना समाजात दुय्यम स्थान मिळते. समाजाच्या मुख्यप्रवाहापासून तो वर्ग बाहेर असतो. अनधिकृत जागेत राहात असल्याने त्यांना नागरी सोयी सुविधा मिळत नाहीत, शैक्षणिक सोयी सुविधां अभावी तो निरक्षर राहातो. झोपडीवासीय संघटीत नसल्याने त्यांच्या व्यावसायीक संघटना नसतात. मिश्र लोकवस्तीमुळे जातीय संघटना नसतात, असल्यातरी त्या फारश्या प्रभावी नसतात. अशा वेळेस हा वर्ग समाजापासून दूर गेलेला असतो.

झोपडीवासीयांचा उपयोग राजकीय क्षेत्रात मते मिळवणे आणि मोर्चा आंदोनांमध्ये जमाव जमविण्यासाठी केला जातो. झोपडीवासीय शहरी राजकारणापासून अलिप्त,उपरे असतात. मतदान करणे एवढाच त्यांचा मर्यादित राजकीय सहभाग राहतो. झोपडपट्टीतील नेतृत्व हे जातीच्या आधारावर उभे असते त्यामुळे राज्य किंवा केंद्र पातळीवर या स्थानिक नेतृत्वाला कोणत्याही उच्च पदावर घेतले जात नाही. त्ययामुळे त्यांचे नेतृत्व स्थानिक पातळी पुरतेच मर्यादीत राहाते. झोपडया पूर्णत: उठवल्या जात नाहीत कारण मतांच्या राजकारणाचा प्रश्न असतो सततच्या असुरक्षिततेच्या वातावरणात झोपडीवासीय राहात असतात. झोपडीवासीयांचा प्रश्न फक्त

दारिद्र्य,जीवनावश्यक गरजा एवढाच मर्यादित न राहाता त्यांचे जीवनमान कसे उंचावले जाईल याचा विचार झाला पाहिजे. राजकीयदृष्ट्या झोपडीवासीय राहात असलेली वस्ती,जागा महत्वाची असते. एक गठ्ठा मत घेण्याससाठी ती महत्वाची असते, या प्रवृत्तीतून झोपडपट्ट्या वाढत जातात. एक गठ्ठा मता व्यतीरिक्त झोपडपट्ट्यांचे वेगळे स्वतंत्र अस्तित्व नसते. स्थानिक निवडणुकांमध्ये झोपडपट्ट्यांना महत्व आलेले असते. राजकीय कार्यकर्त्यांचा स्वार्थ झोपडपट्ट्यांत असतो. थोडक्यात झोपडपट्ट्या या शहरी राजकाणाचा एक भाग असतात त्यांना कोणतीही स्वतंत्र राजकीय ओळख नसते, ते आपला प्रभाव राजकीय प्रक्रियेवर पाडू शकत नाही.झोपडीवासीय फक्त गरीबीचेच जीवन जगत नसतात तर ते असुरक्षित जीवन देखील जगत असतात. ते राजकीय, सामाजिक, आर्थिकव्यवस्थेतून बाहेर फेकले गेलेले असतात त्यांची वेगळी संस्कृती तयार होते. सर्व झोपडीवासीय या संस्कृतीत समरस होतात परंतु समाजाच्या मुख्यप्रवाहातून दूर गेलेला हा वर्ग झोपडपट्टीतील आपल्या अस्मिता पूर्णपणे देखील स्विकारत नाही हे ही तितकेच खरे. समाजव्यवस्थेत, शहर नियोजनात झोपडपट्ट्या अडथळा ठरतात मात्र याच झोपडपट्ट्यांतून आर्थिक व्यवस्थेत हातभार लावणारा मोठा वर्ग मिळतो हे वास्तव नाकारता येत नाही. स्थानिक राजकारणात राज्यकर्त्यांचे स्थान बळकट करण्यासाठी झोपडपट्ट्या उपयोगी ठरतात. एव्हाना त्यांचा वापर केला जातो. त्यादृष्टीने राजकारणाचा झोपडपट्ट्या एक महत्वाचा भाग असल्याचे मान्य करावे लागते.

**संदर्भ सूची –**

१. खरात शंकरराव – झोपउपट्टी.
२. गारे गोविंद व जिमये – महाराष्ट्रातील दलित – शोध व बोध
३. गाडगीळ मालती – डबा बाटलीवाली
४. सोमण आणि पराडकर – भारतातील सामाजिक समस्या
५. साप्ताहिक अनुभव सप्टें. १९९६
६. समाजप्रबोधन पत्रिका १९९९

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.
PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403